# बीड नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील लेबर टेंडर मधील भ्रष्टाचाराची जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार पुढील अंकात?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १६६ ■ मंगळवार दि.४ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 166 ■ Tuesday Dt. 4 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

### केज शहरात कडकडीत बंद

**केज । प्रतिनिधी**

आज संतोष देशमुख हत्ये प्रकरणातील फोटो व्हायरल झाल्यामुळे समाज भावनांचा उद्रेक झाला तसेच मनाला हेलावून टाकणारे, हृदयद्रावक फोटो पाहून जनतेच्या मनात आरोपी विषयी चीड निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर आज बीड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले त्या पार्श्वभूमीवर आज केज शहरातील सर्व बाजार पेठा बंद ठेवण्यात आल्या अघोषीत संचार बंदी सारखे चित्र निर्णाण झाले होते कोठेही अनुचीत प्रकार घडू नये याची दक्षता केज पोलिसांनी घेवून केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता केज शहरात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता जिल्हा बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस दल अलर्ट मोडवर होते. केज बंद करण्यासाठी केज शहरांमधून मोठी रॅली निघाली रॅली दरम्यान संतोष देशमुख हत्येतील आरोपींना फाशी झालीच पाहिजे अशा घोषणा देण्यात आल्या.

### गांजपूर ग्रामपंचायतचा कारभार उपसरपंच बाळासाहेब डापकरांकडे

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील गांजपूर येथील सरपंच कस्तुरा साला पवार यांचे आपले जात वैधता प्रमाणपत्र दाखल न केल्यामुळे सरपंच पद रद्द होवून ग्रामपंचायतचा कारभार चालण्यासाठी उपसरपंच बाळासाहेब डापकर यांच्याकडे सरपंच पदाचा पदभार देण्यात आला. मागील २५ महिन्यापासून गाव हे विकासापासून वंचित राहिले आहे, आता गावात विकासाची गंगा आणण्याचा संकल्प आपला असल्यचे पदभार स्वीकारताना बाळासाहेब डापकर यांनी सांगितले. धारूर तालुक्यातील गांजपूर येथील सरपंच कस्तुरा साला पवार या २०२२ साली सरपंच पदी निवडून आल्या. राज्यातील ग्रामपंचायत निवडणूकीत निवडून आलेल्या उमेदवाराला सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र तहसील कार्यामध्ये जमा करायचे होते, पण दोन वर्षे झाले तरी जात प्रमाणपत्र जमा न सांगितले.

# बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच मंत्रीपदाचा राजीनामा



**बीड । प्रतिनिधी**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करतानाचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या निर्दयी कृत्याचा सर्वस्तरातून निषेध व्यक्त होवू लागला आहे. अख्खा महाराष्ट्र सुन्न झाला असून अंगात हैवानियत घुसलेल्या या आरोपींना आता फाशीच द्या अशी मागणी होवू लागली आहे. केवळ धनंजय देशमुख यांच्याच डोळ्यात नव्हे तर अख्खा महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्यात या प्रकारावरून प्रचंड आग दिसू लागली आहे. प्रत्येकजण या निर्दयी कृत्यावरून अरे–अरे असे म्हणत निषेध व्यक्त करू लागला आहे. या सर्व प्रकारानंतर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे.**



दरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतरही मुंडे व त्यांच्या कार्यकर्त्यांची मयुरी अजूनही संपली नसल्याची संतप्त भावना व्यक्त केली आहे. या लोकांची मयुरी अजूनही संपली नाही. एवढा खून होऊनही त्यांच्यात पश्चातापाची कोणतीही भावना नाही. हे आता सरकार व मराठा समाजाच्या लक्षात आले आहे, असे ते म्हणालेत. या प्रकरणात धनंजय मुंडे हे ३०२ चा आरोपी आहे. त्यांनी आपल्या गुंड मित्राला वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. पण आता फडणवीस व अजित पवारांनी लाथ घालून त्यांना बाहेर काढले. कालच मी फोटो व्हायरल झाल्यानंतर त्यांच्या हकालपट्टीची मागणी केली होती. त्यांनी ती मागणी पूर्ण केली. त्यांनी नैतिकतेने त्यांचा राजीनामा घेतला. त्यांच्याकडे संस्कार आहेत. पण यांच्याकडे (धनंजय मुंडे) माज, मस्ती, मयुरी तशीच आहे, असे जरांगे पाटील म्हणाले. आज सकाळी त्यांनी मस्साजोग येथे भेट देवून देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले.

सकाळी बीड शहरातून सकाळी बंदचे आवाहन करीत दुचाकी रॅली काढण्यात आली. वाल्मिक कराडला फाशी झालीच पाहिजे, अमर रहे अमर रहे संतोष देशमुख अमर रहे अशा घोषणा रॅलीदरम्यान देण्यात आल्या. बंद दरम्यान बीड शहरातील जालना रोडवरील एका गाडीच्या शोरूमजवळ दगडफेकीचा प्रयत्न झाला. प्रत्येक ठिकाणी कडेकोट पोलिस बंदोस्त तैनात करण्यात आला. तर पोलिस संरक्षणात रापमच्या बस सोडण्यात येत होत्या. बीड, घाटनांदूर, अंबाजोगाई, दिंदुड, धारूर, वडवणीसह सर्वत्र कडकडीत बंद पाळण्यात आला. केजच्या धारुर चौकात टावर जाळण्यात आले.

## धनंजय मुंडेंची मग्रुरी अजून संपली नाही, ते ३०२ चे आरोपी, त्यांना पश्चाताप नाही : मनोज जरांगे पाटील

### आजचा राजीनामा ही एकप्रकारची कबुलीच : छत्रपती संभाजीराजे

बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर या घटनेचे थरकाप उडवणारे फोटो व्हायरल झाले आहेत. संतोष देशमुख यांना अंतर्वस्त्रावर बसवून आरोपींनी राक्षसी वृत्तीने मारहाण केल्याचे फोटो माध्यमातून समोर आल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यानंतर, राजकीय दबाव वाढताच मंत्री धनंजय मुंडेंनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मुंडेंच्या राजीनाम्यानंतरही राज्यभरातून तीव्र भावना व्यक्त होत असून गेल्या अडीच महिन्यांपूर्वीच हा राजीनामा घ्यायला हवा होता, असे विरोधकांकडून म्हटले जात आहे. तर, मंत्री पकंजा मुंडेंनीही राजीनाम्यावर आपली भूमिका स्पष्ट केली असून, धनंजयला मंत्रिपदच द्यायला नव्हते पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. आता, स्वराज्य पक्षाचे संस्थापक व माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर परखड भूमिका मांडली. तसेच, मंत्रिपदाचे कवच घालून तुम्ही आरोपपत्र दाखल करण्याची वाट पाहात होता का, असा सवालही संभाजीराजेंनी विचारला आहे.

### “ माझ्या सदसद् विवेकबुद्धीला स्मरून

या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद् विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे.

– आ. धनंजय मुंडे.

# बीडच्या एमजीपी कार्यालयात दीड कोटीच्या एक्स्ट्रा आयटमच्या नावावर गजानन खराटे, दीपक कोळी, मनीषा पलांडे टक्केवारी मध्ये?



■ बीडचे पालकमंत्री अजित अजित पवारांनी लक्ष देणे गरजेचे बीडचा एमजेपी कार्यालयात ५०० कोटीच्या पाणीपुरवठा योजनेचा भट्ट तर दीड कोटीच्या एक्स्ट्रा आयटमची टक्केवारी मध्ये अखेर कामाला सुरुवात?

■ मनीषा पलांडे दीपक कोळी गजानन खराटे यांनी टक्केवारी घेऊन एक्स्ट्रा आयटमच्या दीड कोटीच्या ऑनलाइन टेंडरची प्रक्रिया न करताच चालू केलं काम?

■ एमजेपी कार्यालय बीडच्या बिल्डिंगचं काम ७ वर्षापासून संपता संपना चिवरे गेले खराटे आले नियम धाब्यावर बसून एक्सट्रा आयटम दीड कोटीचे एक्सट्रा आयटम कसे मंजूर झाले?

पान २ वर





# बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगाराच्या हाती कोयत्या ऐवजी रेशीम धागा

## बीड तालुक्यात सातशे हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर रेशीम शेती बहरली : तहसीलदार शेळके यांची माळापुरी येथे शेतीभेट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. ऊसतोड कामगार मोठ्या प्रमाणात आहेत. पावसाचा लहरीपणा व अनियमित पिकणारी शेती याला कुठेतरी फाटा देत बीड जिल्हातील शेतकरी मोठ्या प्रमाणात तुतीची लागवड करून रेशीम कोष उत्पादन करत आहेत, ही लक्षणीय बाब आहे. पावसाळा सुरु झाला, खरीप पीक घेतले की उर्वरित आठ महिने ऊसतोडीला जायचे, असा सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांची शिरस्ता. कापसासारखे नगदी पिकही आता परवडेनासे झाले. अशा परिस्थितीत नरेगा च्या माध्यमातुन रेशीम कोषा च्या विक्रीतून शेतकरी बीड तालुक्यात आज लखपती होत आहेत असे जिल्हा रेशीम अधिकारी शंकर वराट यांनी कळवले आहे.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना वेळोवेळी ही बाब खटकत होती. ऊसतोड कामगार, अल्पभूधारक शेतकरी यांच्यासाठी काही करता येईल का, यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. नरेगाच्या माध्यमातून रेशीमशेती, तुतीलागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी जिल्हा रेशीम अधिकारी, तहसीलदार यांना सूचित केले.

बीड तालुक्यातील माळापुरी येथील प्रगतशील शेतकरी मस्फूर बेग हे रेशीम शेती मधून वर्षाकाठी एक एकरातून अडीच ते तीन लाख रुपये सहज नफा कमवतात. त्यांच्या खास भेटीसाठी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके माळापुरी येथे सोमवार दिनांक ३ मार्च रोजी पोहोचले. परिसरातील विविध रेशीम शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर पाहणी करून रेशीम शेती किती किफायतशीर आहे हे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या तोंडूनच त्यांनी या ठिकाणी ऐकले. यावेळी शेतकऱ्यांनी इतर पिकाच्या तुलनेत रेशीम शेती खूप फायद्याची असून शाश्वत उत्पादनाची हमी या शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळते असे आवर्जून सांगितले.

बीड तालुक्यामध्ये एकूण ७२९ एकरवर तुती पिकाची लागवड केली असून या पिकाच्या माध्यमातून शेतकरी मोठ्या प्रमाणात रेशीम कोष उत्पादन करून आपले आर्थिक जीवनमान उंचावत आहेत. बीड तालुक्यात माळापुरी, काकडहिरा, बेलखंडी पाटोदा, उमरदखालसा, नागापूर बुद्रुक, खांडे पारगाव, कामखेडा, राक्षस भुवन, कुक्कडगाव, नेकनूर सफेपुर, घाट जवळा, बऱ्हाणपुर, परभणी केसापुरी, कदमवाडी, नाळवंडी या गावात तुती लागवड मोठ्या प्रमाणात होते. विशेष म्हणजे बीड शहरातच रेशीम अंडकोष विक्रीचे विक्री केंद्र आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल बंगलोर किंवा कर्नाटक कडे घेऊन जावा लागत नाही.



# डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार यांची निवड

## कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, तर उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे यांची वर्णी

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेची संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार, कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे तर सचिवपदी शेख समद यांची निवड जाहीर केली आहे.



प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ३ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- अभिजीत पवार, कार्याध्यक्ष- लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्ष- दीपक वाघमारे, सचिव- शेख समसाद तर संघटकपदी- अरबाज आतार खाजामिया यांचा समावेश आहे.

बीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळया डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी बीड तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सनकी नवऱ्याने बायकोला संपवलं

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये नवऱ्याने बायकोची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घरगुती वादातून बळजबरीने विवाहितेला नवर्याने विष पाजलं. या घटनेत विवाहितेचा मृत्यू झाला. या घटनेनंतर महिलेचे नातेवाईक आक्रमक झालेत. महिलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. बीड जिल्हा रुग्णालयाबाहेर महिलेच्या नातेवाईकांनी आक्रोश केला. आरोपीला अटक करत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा आक्रमक पवित्रा महिलेच्या नातेवाईकांनी घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विवाहित महिलेला बळजबरीने नवर्याने विष पाजून हत्या केल्याची धक्कादायक घटना बीडच्या गेवराई तालुक्यातील राजपिंपरी येथे घडली आहे. कोमल नागेश पाटोळे असं मृत महिलेचे नाव आहे. ७ वर्षांपूर्वी कोमलचे लग्न झाले होते. कोमलला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. ७ वर्षापासून कोमलच्या संसाराचा गाडा अतिशय व्यवस्थित सुरू होता. पण तिच्या सुखी संसाराला कोणाची तरी नजर लागली. कोमल आणि तिच्या नवर्यामध्ये घरगुती कारणांवरून सतत वाद होऊ लागले. याच घरगुती वादातून संतप्त झालेल्या कोमलच्या पतीने तिला जबरदस्ती विष पाजलं, असा आरोप कोमलच्या वडिलांनी केला. कोमलच्या हत्येनंतर तिचे कुटुंबीय संतप्त झाले. घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. बीड जिल्हा रुग्णालयाबाहेर कोमलच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी करत आक्रोश केला. सध्या गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जोपर्यंत आरोपीला अटक केली जाणार नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेतला जाणार नाही असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे.

# लातूरजवळ भीषण अपघात



लातूर । प्रतिनिधी

लातूर ते चाकूर महामार्गावर नांदगाव पाटीजवळ दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात बस उलटल्याची घटना सोमवारी दुपारी १.४३ वाजण्याच्या सुमारास घडली. यात ४१ प्रवासी जखमी झाले आहेत. तर सात जण गंभीर असून, दोघांचे हात शरीरापासून वेगळे झाले आहेत. जखमींना लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी धाव घेत जखमींना रूग्णालयात पोहचविण्यासाठी मदत केली. अहमदपूर आगाराची बस लातूरकडे येत असताना चाकूर तालुक्यातील नांदगाव पाटीनजीक दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात उलटली. घटनेनंतर जखमींना तत्काळ रूग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान, सर्वोपचार रूग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. जखमींमध्ये प्रीती कानवटे (वय २२, रा. तळेगाव), अनुसया रोमपटवार (६०, रा. शिरूर), मुरलीधर बंदखडके (७०), रवी देशमुख, व्यंकट भोगे (६१, रा. हडोळती), पार्वती घुगे (४४, रा. अहमदपूर), महानंदा कांबळे (३२, रा. चाकूर), महादेव आडे (२३, रा. लातूर), गोविंद रोमपटवार (६०, रा. शिरूर), नसिम कुरेशी (५०, रा. लातूर), वर्षा घुगे (३३, रा. उदगीर), राम जमादार (३१, रा. चाकूर), गंगाधर सोपान बादाडे (४५, रा. अहमदपूर), वामन जाधव (६५, रा. चाकूर), प्रशांत कांबळे (४१, रा. चाकूर), बालाजी मोतीराम भुरे (५५, रा. अहमदपूर), अंजनाबाई माने (५०, रा. अहमदपूर), सुरेखा सूर्यवंशी (५०, रा. ममदापूर), अरुणा तोगरे (६३, रा. चाकूर), शाहुराज घोलप (४५, रा. राबुधोडा), शोभा मदने (३०, रा. गांजूर), अजित सुरवसे (२१, रा. ममदापूर), कपिल चिवडे (२१), सुनीता (३५, रा. चाकूर), मुरलीधर देवकते, इंदुबाई माडगे (५०), प्रथमेश माडगे, बशीर कुरेशी (५५), कमलाबाई (७०), सिद्धनाथ मदने (३५), शकुंतला सदानंदे (५५, रा. उदगीर), गजानन सोनकांबळे (१६, रा. टाकळगाव), सुकुमार गरेकर (२१, रा. टाकळगाव), गोरोबा मरडे (५४), अनुसया मरडे (३६, रा. चाकूर), सिद्धनाथ मरडे (१६, रा. चाकूर), कचरू गायकवाड (७५), लक्ष्मण येमले (५३, रा. लातूर), सिद्धेश्वर मदने (३५, रा. गांजूर), अब्दुल पठाण (रा. लातूर), शेख अझिमोद्दीन (रा. लातूर) यांचा समावेश आहे.

पान १ वरून...

■ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालया छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य अभियंता मनीषाताई पलांडे मॅडम यांनी लक्ष घालणे गरजेचे दीड कोटीच्या एक्सट्रा टम मध्ये गजानन खराटे टक्केवारीच्या नादात गुंग?

■ मुख्य अभियंता श्रीमती मनीषाताई पलांडे यांनी प्रशासकीय मान्यता नसताना दीड कोटीच्या एक्स्ट्रा आयटमला मंजुरी कोणी दिली याची सखोल चौकशी होणे गरजेचे?

■ मुख्य अभियंता ही टक्केवारी मध्ये मॅनेज झाले का मनीषा पलांडे मॅडम आपण चांगले अधिकारी पण आपल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय बीडमध्ये टक्केवारीच्या चर्चेला उधान?

■ एमजेपी कार्यालय बीडच्या बिल्डिंगचं काम सात वर्षापासून संपेता संपेल चिवरे गेले खराटे आले नियम धाब्यावर बसून एक्स्ट्रा आयटमचे दीड कोटीचे एक्स्ट्रा आयटम कसे?

■ एम.जी पठाण उपविभागीय अभियंता एमजीपी कार्यालय बीड पठाण यांच्यावरती निलंबनाची कारवाई करा एक्स्ट्रा आयटमच्या घाटामध्ये मुख्य माणूस म्हणून एम.जी पठाण ची भूमिका?

■ एमजीपी कार्यालयात आलेले एम.जी पठाण जिल्हा परिषद च्या ग्रामीण पाणीपुरवठ्यातून वादग्रस्त असलेल्या भ्रष्टाचाराने बरबटलेल्या एम.जी पठाणला नाईलाजास्तव एमजीपी कार्यालय दिले पण तिथे सुद्धा एम.जी पठाण भ्रष्टाचार आणि बरबटलेले हात घेऊन पुन्हा घाण करू लागला बिल्डिंगच्या दीड कोटीच्या एक्सट्रा टम प्रकरणी तात्काळ एम.जी पठाणला निलंबित करणे गरजेचे?

■ श्रीमती मेघना बोर्डीकर राज्यमंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना सुद्धा या विभागातून टक्केवारी गेली आहे का? कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार श्रीमती मेघना बोर्डीकर यांना ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार बीड एमजीपी कार्यलयातील माहिती नाही का असा प्रश्न आता बीडच्या जनतेला पडलेला आहे?

■ संजय खंदारे प्रधान सचिव पाणी पुरवठा स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई श्री अभिषेक कृष्णा सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांनी दखल घेतलेली नाही त्यामुळे दीड कोटी रुपयाची नोट होत आहे संजय खंदारे, अभिषेक कृष्णा यांना सुद्धा टक्केवारी गेली आहे का? असा प्रश्न आता बीडच्या नागरिकांना पडला आहे.

■ दीपक कोळी, गजानन खराटे बी.एस ठाकूर, सय्यद अर्शडद यांनी एमजेपी कार्यालय विक्रीला काढले.?

■ एमजीपीच्या एक्स्ट्रा आयटम बिल्डिंगच्या नावाखाली मुख्य सूत्रधार म्हणून सय्यद हर्षद बी.एस ठाकूर, एम.जी पठाण आणि आता नव्याने आलेले गजानन खराटे दीड कोटी ची टक्केवारी मिळून मिसळून खाण्याचे ठरविले आहे?

■ दीड कोटीचे एक्स्ट्रा आयटम करण्याऐवजी त्यांची स्वतंत्र निविदा का मागवली जात नाही मनीषा पलांडे मॅडम आपण लक्ष देणे गरजेचे आहे आपली सर्वस्व जबाबदारी एमजीपी कार्यालयातून गुत्तेदाराला अकाउंटंट असलेला बी.एस ठाकूर पोसू लागला?

■ प्रशासकीय मान्यता नसताना १.१४ कोटीची निविदा २०१९ ला मागविण्यात आली होती? हे खरे आहे

■ १ कोटी १४ लाखांपैकी १ कोटी रुपये खर्च झालेला असताना पुन्हा आता दीड कोटीचे तुकडे करून गुत्तेदार पोसण्यासाठी दीपक कोळी, गजानन खराटे, सय्यद अर्शद,बी.एस ठाकूर यांची टक्केवारी घट्ट नियम डाउलाऊन गुत्तेदाराला दिले जात आहे एक्स नावावरती टेंडर ऑनलाईन प्रक्रिया कार्यालयाला महाराष्ट्र शासनाकडून लागू नाही का.?

■ महाराष्ट्राचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील बीडच्या एमजेपी कार्यालयात ५०० कोटीचा घोटाळयामध्ये आजही आजी माजी अभियंत्यांना आपण पाठीशी घालण्याचा पाप करत आहात?

■ दीड कोटीचे एक्सटम करण्याऐवजी त्यांची स्वतंत्र निविदा का मागवली जात नाही मनीषाताई पलांडे मॅडम आपल्या कार्यकाळामध्ये कोट्यावधी रुपयाचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाला गजानन खराटे, बी.एस ठाकूर, सय्यद अर्शद, दीपक कोळी हे अक्षरशः बीडच्या एमजेपी कार्यालयात नंगानाच करू लागले?

■ तुषार टेकवडे कार्यकारी अभियंता मेकॅनिकल छत्रपती संभाजीनगर यांनी याच दीड कोटीच्या तुकडे पांचेचाळीस ते साठ लाख रुपयांची टक्केवारी घेत यांत्रिकी कामाचं एक्स्ट्रा टमच्या नावाखाली लूट करण्याची परवानगी कोणाच्या आशीर्वादाने मनीषा परांडे मॅडम आपण लक्ष देणे?

■ सहा महिन्यांमध्ये बीड जिल्ह्यातील एमजीपी कार्यालय लुटण्याचे काम यावेळी गजानन खराटे, सय्यद अर्शद, अकाउंटंट ठाकूर यांनी केलेला आहे चिवरेच्या जागी आलेल्या गजानन खराटेने टक्केवारीसाठी धडपड?

■ जिल्हाधिकारी श्री.अविनाश पाठक साहेब एमजीपी कार्यालयात ५०० कोटीच्या घोटाळ्यात गजानन खराटे हात धुवून घेण्याच्या तयारी च्या एक्स्ट्रा टम नावावरती दीड कोटी रुपयांची उधळपट्टी का व कोणाच्या आशीर्वादाने कोणाला पोसण्यासाठी?

■ एमजीपी कार्यालय बीड सर्दी गेली पडस आलं असं म्हणण्याची वेळ दीड कोटीच्या एक्स्ट्रा टम साठी गजानन खराटे मी टक्केवारी ठरवली का?

■ दीड कोटी त्याची स्वतंत्र निविदा गजानन खराटे यांनी का मागवली नाही तात्काळ संबंधित निविदा ऑनलाइन पद्धतीने गजानन खराटे यांनी मागवावी?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये उन्हाळा सुरू झालेला असताना ५०० कोटी रुपयांच्या कामाची आज सुद्धा एमजीपी कार्यालय बीड करून विलेवाट लावण्याचे पद्धतशीर कार्यक्रम करण्यात आलेला आहे तत्कालीन प्रभारी तथा सेवानिवृत्त झालेले कार्यकारी अभियंता के बी चिवरेयांच्या कार्य काळामध्ये एक्सट्रा आयटमचा घाट घालून गुत्तेदारला पोचण्यासाठी एमजीपी कार्यालयाचे बीएस ठाकूर अकाउंटंट प्रभारी सय्यद अर्शद उपअभियंता एमजेपी कार्यालय बीड यांनी संगमत करून सुमारे दीड कोटी रूपाच्या एक्स्ट्रा टमची प्रशासकीय मान्यता नसताना ऑनलाईन टेंडर प्रक्रिया कुठेही न करता थेट गुत्तेदाराला कागदावरती एक ठराव घेऊन दीड कोटी रुपयाचा एक्सट्रा बिल्डिंगच्या आयटम साठी एक परवानगी दिली त्यातून गुत्तेदार पोहोचण्यासाठी गायकवाड नावाचा गुत्तेदार त्यांनी पोहोचण्यासाठी व आपली टक्केवारी घेत एमजीपी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील दीपक कोळी अधीक्षक अभियंता यांना हाताशी धरून गुत्तेदार गायकवाड कंट्रक्शन यांना दीड कोटी रुपयांचे एक्स्ट्रा आयटमचे तुकडे पाडून देण्याचा घाट या वेळी गजानन खराटे बी.एस ठाकूर सय्यद अर्शद यांनी केलेला आहे परंतु बीडच्या एमजेपी कार्यालयांमध्ये ५०० कोटी रुपयांचा घोटाळा असताना पुन्हा एकदा नियम धाब्यावर बसून एक्सट्रा आयटमच्या बिल्डिंगच्या कामासाठी येत्या दोन दिवसांमध्ये सुरुवात करणार असल्याची चर्चा एमजीपी कार्यालयातील प्रभारी कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याने दैनिक महाराष्ट्र आरंभशी बोलताना नाव न सांगण्याच्या अटी वरती सेवानिवृत्त अधिकाऱ्याने विश्वसनीय माहिती दिलेली आहे परंतु बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या निदर्शनास संबंधित बाब समोर येणार आहे. श्री अर्शद नावाच्या व ठाकूर नावाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी टक्केवारीचा विडा उचललेला आहे आम्ही गुत्तेदाराला दीड कोटी रुपयांची तुकडे पाळून बिल अदा करण्यासाठी जिम्मेदारी घेतो असं के बी चिवरे यांच्या कार्यकाळामध्ये व विद्यमान गजानन खराटे प्रभारी कार्यकारी अभियंता यांच्या वतीने सांगण्यात आल्याची ही माहिती विश्वासने सूत्रांनी दिलेली आहे तर एमजीपी कार्यालयातील गजानन खराटे हे प्रभारी

■ खराटे यांनी दीड कोटीचे एक्स्ट्रा आयटम रद्द करून ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा का मागितली नाही.

■ खराटे यांनी पैश्या पोटी नियम धाब्यावर बसून दीड कोटीचे एक्सट्रा आयटमला वर्क ऑर्डर दिली?

■ बिल्डिंगची १.१४ कोटीची निविदा २०१९ ला मागविण्यात आलं होतं बिल्डिंगचं काम संपले अजून त्याच ठेकेदारला एक्स्ट्रा आयटमच्या नावा खाली दीड कोटीची एक्सट्रा आयटम नियम बाह्य दिले आहे

■ दैनिक महाराष्ट्र आरंभ वृत्त पत्र दि. ०७.१०.२०२४ मध्ये प्रकाशित बातम्याची शासनाने दाखल घेऊन राज्य पाणी व स्वच्छता मिशन चे उपसचिव श्रीमती माधुरी कुंभार यांनी पत्र दिनांक ११.११.२०२४ नुसार एक्सट्रा आयटम रद्द करणे कारवाईसाठी मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी सुचना होते.

■ बिल्डिंगच्या कामा मध्ये दाम घेऊन एक्सट्रा आयटम मंजूर करून देण्यात आले.

कार्यकारी अभियंता हे फक्त टक्केवारी घेण्यासाठीच आपला पदभार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचा राजकीय वरदहस्त लाभलेल्या गजानन खराटेला कोणी व कोणाच्या आशीर्वादाने दिलेला आहे हे पालकमंत्री येणाऱ्या काळामध्ये नक्कीच तपासतील अशी अपेक्षा बीडच्या जनतेला आहे पण यावेळी मात्र खराटेचा नंगानाच बीडच्या एमजेपी कार्यालयात आहे त्यामुळे एमजीपी कार्यालयाचे वाटोळ होणार असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे.

खराटे आणि नेमकं गायकवाड नावाच्या गुत्तेदाराला एक्स्ट्रा टमची मंजुरी कोणाच्या आदेशाने दिली हे मीडियासमोर सांगा व दीड कोटी रुपयांचा महाराष्ट्र शासनाला व एमजीपी कार्यालया बीडला चुना लावण्याचे काम यावेळी गजानन खराटे चं पण होत आहे तरी गजानन खराटे यांनी गायकवाड नावाच्या गुत्तेदाराला कोणत्या आधारावरती दीड कोटीचे एक्स्ट्रा टम मंजूर करून त्या ठिकाणी काम करण्याचे आदेश दिलेले आहेत हे अजून गुलदस्त्यात आहे प्रशासकीय मान्यता नसताना कुठल्याही प्रकारचे ऑनलाइन टेंडर नसताना गुत्तेदार दीड कोटीचे तुकडे पडून काम कसा करतो असा प्रश्न आता बीडच्या नागरिकांना पडला आहे सामाजिक कार्यकर्ते नेतेमंडळी आजी माजी आमदार आजी-माजी पालकमंत्री व विद्यमान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार धनंजय मुंडे, पंकजा मुंडे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर या प्रकरणाकडे लक्ष वेधणार आहेत आणि येणाऱ्या काळामध्ये एमजीपी मधील ५०० कोटीचा घोटाळा आता भर उन्हाळ्यामध्ये अनेक नागरिकांच्या तोंडच पाणी पळवल्यामुळे गजानन खराटे, के बी चिवरे, सय्यद अर्शद, अधीक्षक अभियंता दीपक कोळी व मुख्य अभियंता छत्रपती संभाजीनगर मनीषाताई पलांडे यांना आता मीडियाला व जनतेसह राजकीय नेत्यांना व शासनाला याचे उत्तर देण्यासाठी तोंडच पाणी या अधिकार्याचे पळणार आहे बीडच्या एमजीपी कार्यालयात अक्षरशः नंगानाचं यांचा चालू आहे त्यामुळे आता पुन्हा एकदा दीड कोटीचे एक्स्ट्रा टम कोणाच्या आशीर्वादाने देण्याचं पाप या ठिकाणी गजानन खराटे करत आहेत ही आता बीडच्या जनतेने विचारलं आहे त्यामुळे बीडच्या नागरिकांमध्ये एमजीपी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर रोष व्यक्त होत आहे.

# शामराव थोरात गुरुजींचा केज येथे गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळा

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव येथील रहिवाशी असणारे शामराव थोरात गुरुजी हे समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे योगदान विशेषतः ग्रामीण शिक्षण,सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय राहिले आहे. याचबाबींवर प्रकाश टाकण्यासाठी कार्य गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन दि.२ मार्च २०२४ रोजी जे.के फंक्शन हॉल,फुलेनगर केज येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन जेष्ठ साहित्यिक योगिराज वाघमारे तसेच जेष्ठ विचारवंत काळोखे हे होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या व कालकथित श्यामराव थोरात गुरुजी यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करुन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जर्मनी येथे नौकरीस लागलेल्या कु.शिवानी बचुटे हिचा संयोजकाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर श्यामराव थोरात गुरुजी यांच्या जीवन कार्यावर प्रकाशन टाकणारा कार्य गौरव ग्रंथ समतेचा शिलेदार या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.वसंत ओगले यांनी केले. त्यानंतर गुरुजींच्या सोबत सर्व स्तरावर कार्य करणाऱ्यांनी आपले विचार व्यक्त करून कालकथित शामराव थोरात गुरुजी यांच्या आठवणी जिवंत केल्या. मान्यवरांच्या मनोगता नंतर अध्यक्षीय समारोपात समतेचा शिलेदार शामराव थोरात गुरुजी अष्टपैलु व्यक्तिमत्व यावर डॉ.सुखदेव थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन प्रज्ञा जाधव हिने केले तर आभार डॉ.सचिन थोरात यांनी मानले.या कार्यक्रमाचे आयोजन गौरव ग्रंथ समिती चे अध्यक्ष डॉ. अशोक मुजमुले, सचिव डॉ.ओमप्रकाश नायर तसेच गौरव ग्रंथाचे मुख्य संपादक प्रा.प्रकाश सिरसाठ यांनी केले होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने जन समुदाय उपस्थित होता.

सामाजिक कार्यकर्ते बाबूरावजी गालफाडे सर तसेच सायं. दैनिक आरंभ चे तालुका प्रतिनिधि पांडुरंग कसबे व अनेक पत्रकार यावेळी उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्या साठी माजी नगरसेवक कपिल मस्के, दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे, नय्युम शेख, विलास पवळे,निशांत जाधव,रोहित थोरात, राहुल शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# हा वाल्मिकी नाही तर वाल्या राक्षस आहे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राला हादरून सोडणारी मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होय. या प्रकरणा त पोलीस तपासामध्ये फोटो व व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून मन सुन्न झाले आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करताना आरोपींच्या चेहऱ्यावर जो असूरी आनंद होता तो त्यांच्या आकाच्या आशीर्वादामुळेच होता या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासी देण्यात यावी अशी मागणी युवासेना कार्यकारणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षण विपुल पिंगळे, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी केली आहे.

**वाल्मीक कराड सह सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी : पिंगळे, बहीर, बडे, शिंदे**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मागील तीन महिन्यापासून जिल्हा सह राज्यात गाजत आहे या प्रकरणात आता जे फोटो बाहेर आले आहेत त्यावरून असे दिसते की सरपंच संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करत मानवता कलंकित होईल असे कृत्य या आरोपींनी केले आहे. विशेष म्हणजे या सर्व गुन्ह्यामध्ये त्यांना साथ देणारा वाल्मीक कराड हाच मास्टर माईंड आहे. या सर्व आरोपींना तात्काळ फासावर लटकवावा यापुढे महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात अशा घटना करण्यास कुणीही धजावणार नाही. किळश येणाऱ्या घटनेची जेवढे निषेध करता येईल तेवढे कमीच आहे . मनात अत्यंत वेदना होत असून वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासावर लटकण्याची मागणी युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासावर लटकवण्याची मागणी युवा सेनेचे वतीने करण्यात आली आहे.

# डॉ. सारिका क्षीरसागर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये डॉ.सारिका ताई क्षीरसागर यांचा वाढदिवस कार्यकर्त्यांनी विविध उपक्रम राबून मोठ्या उत्साहात साजरा केला.



डॉ.सारिका ताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कार्यकर्त्यांकडून तीन दिवसीय उपक्रमांचे आयोजन करण्यात होते. यामध्ये वन डे टर्फ मॅचेस चे आयोजन करण्यात आले होते. बीड नगरीतील अनेक खेळाडूंनी यामध्ये सहभाग नोंदवला. सुप्रीम किंग या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले. शिवरात्री दिवशी डॉ.सारिका ताई क्षीरसागर यांच्या उदंड आयुष्यासाठी शिव अभिषेकाचे आयोजन देखील करण्यात आले. जोशी महाराज यांनी माऊली नगर येथील अगस्तेश्वर मंदिरामध्ये संपन्न केला. तसेच आनंदग्राम येथे पिढीत मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप केले व सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. यासर्व कार्यक्रमांचे आयोजन विशाल तांदळे, अनिकेत सानप व संदेश खेडकर यांनी केले होते.

# लोकशाही पत्रकार संघाच्या उमर खान, एजाज दोस्त, रहीम खान यांच्या निवडी जाहीर

बीड । प्रतिनिधी





बीड येथील शासकीय रेस्ट हाऊस येथे काल दिनांक ३ मार्च २०२५ रोजी दुपारी २ वा.लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष आयेशा मुलानी, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, अनिस कुरेशी, रामदास तपसे, बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी, परळी तालुका अध्यक्ष मुकुंद ताटे यांनी उमर खान अय्युब खान यांची बीड शहर संघटक पदी, एजाज दोस्त मोहम्मद खान बीड शहर उपाध्यक्ष पदी तर रहीम खान नईम खान जागिरदार बीड शहर अध्यक्ष (सामाजिक कार्य विकास समिती) पदी यांची निवड संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण यांच्या आदेशानुसार केली.

या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्या आणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.

प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद म्हणाले की, बीड शहर तालुकयातील प्रत्येक गावात पत्रकार असला पाहिजे. त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी लोकशाही पत्रकार संघा मार्फत मी प्रयत्न करणार आहे. नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले – सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर – नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# मिले जो कड़ी–कड़ी एक ज़ंजीर बने!

## ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी अनेक हात सरसावू लागले

बीड (प्रतिनिधी) – शहराची ऐतिहासिक ओळख असलेल्या कारंजा टॉवर ची दुर्दशा लवकरच संपणार असे आता वाटू लागले आहे. कारण टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण व्हावे. या ऐतिहासिक इमारतीला पूर्व वैभव पुन्हा प्राप्त व्हावे. याकरिता ज्येष्ठांसह तरुणांची फळी पुढे सरसावली आहे. यामुळे मिले जो कड़ी–कड़ी एक ज़ंजीर बने या म्हणीप्रमाणे लोक आपसात जोडले जात असून कारंजा टॉवर चे रूप सर्वांग सुंदर करण्यासाठी झपाटले आहे. कारंजा टॉवरचे नूतनीकरण परिपूर्ण करावे म्हणून १४ फेब्रुवारी २०२५ रोजी देण्यात आलेल्या निवेदनानंतर आतापर्यंत प्रत्येक दिवशी कारंजा टॉवरसाठी ज्येष्ठ आणि तरुण मिळून काही ना काही प्रयत्न व कार्य करीत आहे. टॉवरला लागून प्रथम चार सिमेंटचे बाकडे ठेवण्यात आले. आता



त्यात अजून एका सिमेंट बाकड्याची भर पडली असून आता सिमेंट बाकड्यांची संख्या पाच झाली आहे. अजूनही दहा एक सिमेंट बाकड्यांची गरज आहे. सर्वांचे सहकार्य असेच राहिले तर उर्वरित जागेवर आवश्यक त्या संख्येत सिमेंटचे बाकडे येतील हे नक्की. या बाकड्यांमुळे ज्येष्ठ व वयोवृद्धांसह तरुणांना सुद्धा निसर्गरम्य व नयनरम्य वातावरणात बसण्याचा आनंद मिळू लागला आहे. आतापर्यंत लोकसहभागातून कारंजा टॉवरची साफसफाई करून पाण्याने धुऊन घेण्यात आले आहे. पाण्याच्या फवाऱ्यासाठी बांधण्यात आलेल्या हौदाची साफसफाई करण्यात आली आहे, तेही धुवून घेण्यात आले आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या इमारतीला मोठ्या प्रमाणात विद्रूप करणारे डिजिटल बॅनर चे फ्रेम काढून टाकण्यात आले आहे. टॉवर समोर कचरा आणून टाकणाऱ्यांना येथे कचरा टाकू नका, हे टॉवर आपल्या शहराची ऐतिहासिक ओळख आहे असे समजावून सांगितले जात आहे. एकीकडे लोकसहभागातून अशाप्रकारे कार्य होत असताना दुसरीकडे बीड नगर परिषद आणि जिल्हा प्रशासन मात्र बेडूक गिळून निपचित पडलेल्या सापासारखे अजूनही बेशुद्ध असल्याचे दिसत आहे. हे दोन्ही सरकारी प्रशासन अजूनही कारंजा टॉवर साठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठी पुढे आलेले नाहीत. या दोन्ही कार्यालयांची अशी अनास्था पाहून मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे, तालेब पटेल, युवा कार्यकर्ते फारुख शेख यांनी जोपर्यंत कारंजा टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे म्हटले आहे.

# जयश्री गदळे व शरद गदळे यांच्या लग्न वाढदिवसानिमित्ताने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

श्याम कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री गदळे वड माऊली विद्या प्रसारक मंडळाचे सचिव शरद गदळे यांच्या लग्न वाढदिवसानिमित्ताने श्याम गदळे महाविद्यालयाने तालुकास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे याविषयी सविस्तर माहिती अशी की कनिष्ठ महाविद्यालयाच्या कर्तव्यदक्ष व शांत स्वभावाच्या प्राचार्या जय श्री गदळे आणि शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण कामगिरी करणारे तसेच ऊसतोड कामगारांच्या मदतीला धावून जाणारे वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाचे सचिव शरद शामराव गदळे यांच्या लग्न वाढदिवसानिमित्ताने दहिफळ वड माऊली तालुका केज येथील शाम गदळे महाविद्यालयाने तालुकास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे निबंधाचे विषय तरुण व्यक्तीस मोफत शासकीय योजना देणे योग्य की अयोग्य, समाजातील



वाढती गुन्हेगारी, शेतकरी आत्महत्या, बेरोजगार तरुणाचे आत्मवृत्त या विषयावर केज तालुक्यातून निबंध मागविण्यात येत आहेत निबंध लेखनास प्रथम पारितोषिक अकराशे रुपये, द्वितीय पारितोषिक ७०० रुपये आणि तृतीय पारितोषिक ५०१ रुपयाचे आहे प्रवेश विनामूल्य असणार आह अशी माहिती सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रका द्वारे दिली आहे.

# प्रिंट आणि डिजिटल मीडिया एकत्रित येऊन पत्रकारांचा विकास करू : महेबूब शेख

## लोकशाही पत्रकार संघ व महाराष्ट्र टुडे मराठी वृत्तवाहिनी संपादक बैठक संपन्न

परभणी । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघ व महाराष्ट्र टुडे मराठी वृत्तवाहिनी संपादक बैठकीचे आयोजन परभणी येथील सावली रेस्ट हाऊस येथे केले होते. या बैठकीस महाराष्ट्र टुडे मराठी वृत्तवाहिनी चे मुख संपादक महेबूब शेख लोकशाही पत्रकार संघांचे सं. अ. भागवत (बीबी) वैद्य, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आरोही जाधव सह संपादक यांच्या प्रमुख उपास्तीत संपन्न झाली.

यावेळी महेबूब शेख यांनी आपल्या प्रस्ताविकांमध्ये म्हणाले की, महाराष्ट्र टुडे मराठी वृत्तवाहिनी आणि लोकशाही पत्रकार संघ एकत्रित येऊन आपण पत्रकारांचा विकास करू शकतो. ज्या पत्रकार यांना डिजिटल मीडिया मध्ये काम करायचे आहे. त्या आपण संधी देऊ महाराष्ट्र राज्यात आपण गाव, सर्कल, तालुका, जिल्हा प्रतिनिधी करून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करू. याविषयी सर्व उपास्तीत संपादकांनी एक मतांनी ठराव समंत केला. सामाजिक कार्य करण्याचा पण संकल्प करू. प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण आपल्या भाषणात म्हणाले की, आपण काही सामाजिक, आर्थिक प्रोजेक्ट चालू करू. या प्रोजेक्ट च्या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळेल. यामुळे देखील आपलेला प्रसिद्धी, मानसन्मान मिळेल. तसेच



लोकशाही पत्रकार संघाचे सं. अ. बीबी वैद्य आपल्या भाषणात म्हणाले की, प्रिंट आणि डिजिटल मीडिया एकत्रित येऊन अनेक कामे, प्रश्न, अडचणी मार्गी लावू शकतो. महेबूब शेख यांनी जो ठराव मांडला तो आपण सर्वांनी एकमताने समंत केला. त्याबद्दल सर्वांचे मी प्रथम अभिनंदन करिन. येणाऱ्या काळात अपन काही प्रोजेक्ट वर काम करणार आहोत. यामुळे अनेक लोकांना रोजगार मिळणार आहे. लवकरच एक एक विषय हाती घेऊन कामे मार्गी लावू. यावेळी कोमल खरात यांनी निवड लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाडा अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती पदी घोषणा करण्यात आली. तसेंच डी. एम. ढवळे यांची निवड महाराष्ट्र टुडे मराठी वृत्तवाहिनी च्या जालना जिल्हा प्रतिनिधी तर लोकशाही पत्रकार संघाच्या जालना जिल्हा अध्यक्ष पदी घोषणा करण्यात आली.या बैठकीस परसराम जाधव कार्यकारी संपादक, भिमराव हैबते सहायक संपादक तथा मराठवाडा समन्वयक, विशाल गायकवाड समन्व्यक, संजय थोरात समन्व्यक, कोमल खरात आदी मान्यवर उपस्तित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय थोरात यांनी केले तर आभार भीमराव हैबते यांनी मानले.

# पाणीप्रश्न गंभीर : नागरिकांवर आली वणवण फिरण्याची वेळ



## उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच पाचेगाव येथे तीव्र पाणी टंचाई

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई पासून २१ किलोमीटर अंतरावर असलेल्या पाचेगाव या गावात जवळपास अडीच हजार लोकसंख्या आहे मात्र या गावात पाणी प्रश्न अतिशय गंभीर झाला असुन ग्रामपंचायत कडून वेळेवर पाणीपुरवठा न केल्यामुळे महिलांची पाण्यासाठी भटकंती होत आहे. तेथील नागरिकांना सध्या कडकडीत उन्हाळा सुरू झाला असून त्याकरिता जारचे पाणी विकत घेऊन आपली तहान भागवावी लागते तरीही यावर ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप पाणी प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न देखील केला नाही. पाचेगाव मध्ये होणांऱ्या पाणीपुरवठामध्ये सध्या कमालीचा विस्कळीतपणा आला असल्याने पिण्याचा पाणी प्रश्न पंधरा दिवसातून एकदा पुरवठा केला जातो. त्यामुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विस्कळीत पाणीपुरवठ्याला ग्रामपंचायत जबाबदार असून नागरिकांची पाण्यासाठी भटकंती याच प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे सुरू आहे, असा आरोप जनतेतून होत आहे

सध्या नागरिकांना पिण्यासाठी जार तर सांडपाण्यासाठी टँकर विकत घ्यावे लागते. आकाराण आर्थिक भुर्दंड सोसावे लागत असुन पाण्याचे स्त्रोत आटू लागल्याने टँकरचे भाव वाढले आहे त्यामुळे विकतचे पाणी घेणे ही नागरिकांना परवडत नाही म्हणून सामान्य जनतेने करायचे तरी काय असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

पाचेगावच्या विस्कळीत पाणीपुरवठ्याला ग्रामपंचायत व संबंधित सरपंच उपसरपंच व कर्मचारी तेच जबाबदार असल्याने नागरिकांना पाणीपुरवठा व मूलभूत सुविधा देण्यासाठी त्यांनी यापुढे प्रयत्न करावेत असे बोलले जाते. पंधरा दिवसाला एकदा येणाऱ्या पाण्यामध्ये कचरा व घाण येत असून त्यावर तवंग निर्माण होत आहे तर त्या पाण्याचा विशिष्ट प्रकारचा वासही येत आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे.

पाचेगाव येथील सामान्य जनतेचे पाण्यासाठी होत असलेले हाल ग्रामपंचायत व प्रशासनाने लक्षात घ्यावे त्यावर तात्काळ उपयोजना राबवून विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी एकमुखी नागरिकांकडून होत आहे.



## छत्रपती संभाजीनगर येथे ट्रेनी शिक्षकांचा मुकमोर्चा

गेवराई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत कार्यरत ट्रेनी शिक्षक हे शासन निर्णयाच्या आधिन राहून, शासन निर्णयाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र व पुर्ण वेळ नियुक्त शाळेवर कार्यरत असून, शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने सहा महिन्याचा प्रशिक्षणाचा कालावधी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये संपत आहे.

आमचा कार्यकाळ पुढील ६ महिने वाढवण्यात यावा. करिता किमान शैक्षणिक वर्ष पूर्ण करण्याची बाब विचाराधीन ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व ट्रेनी शिक्षक यांचे प्रशिक्षण किमान पुर्ण होण्याच्या अनुषंगाने विचार करून आपण ट्रेनी शिक्षक यांना सदरील नियुक्ती शाळेवर किमान एक वर्ष (१२ महिने) प्रशिक्षण मिळावे ही किमान अपेक्षा आहे. तसेच वेतनवाढ करण्यात यावी शासकिय नोकर भरतीमध्ये १५ टक्के आरक्षित जागा ठेवण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा अध्यक्ष प्रा.सोपान संत सर व बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रा.अलीम सय्यद सर आगाम नितीन सर यांनी केली अशा प्रमुख मागण्यासाठी छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी मूक मोर्चा चे आयोजन केले असता या मोर्चामध्ये बीड जिल्ह्यातील हजारो ट्रेनी शिक्षक उपस्थित होते.

तालुका अध्यक्ष गणेश काशीद, तालुका उपाध्यक्ष रामभिसे, तालुका सचिव तुळशीराम जाधव, मडके, अरुण चव्हाण, गोपाल कन्से, गौरी पवार, चाळक, राधा बरकडे, इंदलकर संदिपान, पंडित जाधव, संदीप वनवे इत्यादी उपस्थित होते.

## धारुर शहर कडकडीत बंद



धारुर / प्रतिनिधी
काल प्रसार माध्यमातून आणी सोशल मिडीयातून सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवेळचे फोटो प्रसारीत करण्यात आले ते फोटो पाहून सर्वच मानव जातीत मारेकर्यांविषयी संतापाची लाट उसळली असून मारेकर्यांना भर चौकात फाशी देण्याची मागणी जनतेतून जोर धरत आहे. किल्लेधारुर शहरात व्यापारी बांधवानी मारेकर्यांचा निषेध करत आपले व्यवहार कडकडीत बंद ठेऊन अश्या प्रवृतीच्या लोकांना फाशीच झाली पाहिजे तसेच आरोपींनी सहकार्य करणारे पोलिस अधिकारी व मदत करणारे व्यक्ती यांच्यावरही गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत अशी मागणी केली आहे.

गुन्हा करतानाचे हावभाव हेच सिध्द करत आहेत कि मारेकरी हे सरावलेले गुंड असून त्यांचेकडे मानवतेचा लवलेशही नाही अश्या गुंडाना भर चौकात फाशी देणेच योग्य ठरेल अश्या तिव्र भावना नागरीक व्यक्त करत आहेत. शहरात वातावरण शांत पण तणावपुर्ण आहे.

## देशमुख हत्याप्रकरण; पुढील सुनावणी १२ मार्चला केज च्या कोर्टात होणार

केज । प्रतिनिधी
मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. त्याप्रकरणी वाल्मीक कराड यांच्यासह आठ जणांवर दाखल करण्यात आलेल्या खंडणी, खून, आणि ॲट्रॉसिटी प्रकरणाची पुढील सुनावणी १२ मार्च रोजी विशेष मकोका न्यायालयात होणार आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची टोल नाक्यावरून अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सीआयडीने अवघ्या ८० दिवसात पूर्ण करून दिनांक २८ फेब्रुवारी रोजी दीड हजार पानांचे दोषारोप पत्र विशेष माकोका न्यायालयात सादर केले आहे.

यात वाल्मीक कराड, विष्णू चाटे, यांच्यासह गुन्हेगारी टोळीचा प्रमुख सुदर्शन घुले, आणि प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, आणि फरार असलेला कृष्णा आंधळे यांच्याविरुद्ध दिनांक २८ फेब्रुवारी रोजी दीड हजार पानांचे दोषारोपपत्र विशेष मकोका न्यायालयाचे दुसरे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांच्या न्यायालयात दाखल झालेले आहे. दिनांक १ मार्चला विशेष मकोका न्यायालयात सुनावणी झाली असून अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांनी या प्रकरणाची पुढील सुनावणी ही १२ मार्च रोजी केज न्यायालयात ठेवली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी तहसीलदार यांना निवेदन



परतूर । प्रतिनिधी
परभणी येथे राहणारी दहा वर्षाची चिमुरडी मुलगी भंगार वेचण्याचे काम करत होती दररोज प्रमाणे ती मुलगी भंगार वेचण्यासाठी गेली होती दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारच्या सुमारास त्या बालिकेला दोन नराधमांनी बळजबरीने उचलून नेऊन कॅनल मध्ये तिच्यावर रात्रभर अत्याचार करण्यात आला आणि सकाळी ती मुलगी आली व रात्री घडलेली घटना आईला सांगितली आणि नंतर गौतम नगर येथे राहणारे यशोदीप कनकुटे व श्रवण टेकुळे या गुन्हेगार वृत्तीच्या लोकांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांना कठोरात कठोर शासन झाले पाहिजेत आणि त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.

जिल्हाधिकारी यांनी हा खटला फास्ट कोर्टात चालवावा जेणेकरून महिला व मुलीवर अत्याचार करण्याचे कोणाचेही धाडस होणार नाही म्हणून जिल्हाधिकारी साहेबांना विनंती आहे की आपण या प्रकरणात गांभीर्याने लक्ष देऊन हे प्रकरण हाताळावे व आरोपीला पाठीशी घालणाऱ्यांना कठोर शिक्षा म्हणजे फाशीची शिक्षा व्हावी. नसता लहू क्रांती संघर्ष सेना या संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर आंदोलन छेडण्यात येईल. या निवेदनावर लहू क्रांती संघर्ष सेना संस्थापक अध्यक्ष राजू कसबे, महाराष्ट्र संघटक विठ्ठल नाटकर, युवक प्रदेशाध्यक्ष अशोक साबळे, जालना जिल्हाध्यक्ष दत्ता घोडे, साहेबराव गायकवाड जिल्हाध्यक्ष धाराशिव आनंद भारसाकळे, परतूर तालुका अध्यक्ष, सुखदेव घोडे, परतूर तालुका कार्याध्यक्ष, सतिश थोरात, सुखदेव साठे आदी कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# स्व.संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या; लिंबागणेशकरांनी उत्स्फूर्त बंद पाळला

लिंबागणेश । प्रतिनिधी
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करताचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्यातील स्क्रीन शाट चार्जशीटला जोडले आहेत.आता हे स्क्रीन माध्यामांच्या हाती लागले असुन ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे.संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजातील ग्रामस्थांनी आज दि.४ मंगळवार रोजी सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवत गावच्या वेशीवर स्व.संतोष आण्णा देशमुख



अमर रहे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा देत उत्स्फूर्त बंद पाळला. यावेळी राजेभाऊ गिरे, पांडुरंग वाणी, बाळकृष्ण थोरात, साहेबराव निर्मळ, अशोक वाणी, विनायक मोरे, दशरथ दाभाडे, विठ्ठल कदम, दिनेश जाधव, महेश ढवळे, बाजीराव नाईगडे, रामकिसन गिरे, अमोल साळवे, अर्जुन घोलप, रवी वायभट, हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा पोलिस प्रशासनावर दबाव असल्याने निष्पक्ष तपास होणार नसल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी बीडकरांची मागणी होती. मात्र पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एकंदरीतच बीडचे पालकमंत्री बीडमधील स्व.संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी संवेदनशील असल्याचे दिसून आले नाही. मुख्यमंत्री यांनी मागील केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे आता नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## कारची दुचाकीला धडक; ऊसतोड मजुराचा जागीच मृत्यू




गेवराई । प्रतिनिधी
समोरून येत असलेल्या भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील ऊस तोड मजुर जागीच ठार झाल्याची घटना काल रविवारी सायंकाळची पाच वाजेच्या सुमारास गेवराई-माजलगाव राज्य रस्त्यावरील सेलू फाटा नजीक घडली.

अर्जुन भाऊसाहेब कोरे (वय-२८) (रा. काठोडा, ता. गेवराई जि. बीड) असे या अपघातात मृत झालेल्या उसतोड मजुराचे नाव आहे. कवडगाव (ता. माजलगाव) येथे तो ऊस तोडीचे काम करत होता. सोमवारी आज त्यास कोर्टात नोटरीचे काम करण्यासाठी काल रविवारी अर्जुन कोरे हा दुचाकीवरुन गाव काठोडा कडे गेवराई-माजलगाव राज्य रस्त्यावरून जात होता.सेलू फाटा जवळपास त्याच्या दुचाकीला समोरील भरधाव वेगातील कारने धडक दिल्याने अर्जुन याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहीती मिळताच तलवाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके पोलीस कर्मचाऱ्यांसह दाखल झाले. घटनेची पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. मृत अर्जुन कोरे याच्या पाश्चात्य आई-वडिल, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार असून, झालेल्या दुर्घटनेबाबत काठोडा गावात हळहळ व्यक्त होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT